**साक्षीदार क्र. २**

**मी याव्दारे प्रतिज्ञेपुर्वक निवेदन करतो की,**

**नाव : संदीप वाल्मीक बढे,**

**वय : ४३ वर्ष, धंदा: चालक,**

**रा. कोल्हार खुर्द, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर**

**साक्षीदाराचा सरतपास सरकारी विधिज्ञ श्रीमती एम. के. सोनवणे यांचेमार्फत सुरू :**

मी फिर्यादी सोमनाथ गोपीनाथ शिंदे यांना ओळखतो. ते क्लिनर होते. मी आरोपीला ओळखत नाही. घटना दि. २६/०६/२०२४ रोजी सायंकाळी साडेचार वाजता घोडेगाव शनिशिंगणापुर सरकारी कार्यालयाच्या तळ्यासमोर घडली होती. त्यादिवशी मी व सोमनाथ शिंदे असे मिळुन दुध ट्रक क्रमांक एम.एच. १७ बी. डी. ६१८३ घेवुन नांदेडला जात होतो. त्यादिवशी आम्ही जात असताना सरकारी तळ्यासमोर घोडेगाव शनिशिंगणापुर रस्त्यावर समोरुन ट्रक आला व त्याने आमच्या ट्रकला समोरासमोरुन धडक दिली. सदर धडकेमुळे माझ्या डोक्याला, छातीला व पायाला मार लागला. तसेच माझ्या सोबत असलेले सोमनाथ शिंदे यांना मुका मार लागला. त्यानंतर आम्हा दोघांना सरकारी दवाखान्यात नेवुन उपचार केले. सदर अपघातामध्ये माझ्या ट्रकचे नुकसान झाले होते. घोडेगाव येथील सरकारी दवाखान्यातुन आल्यानंतर आम्हाला शेळके हॉस्पीटल संगमनेर येथे दाखल केले.त्यानंतर मी व सोमनाथ शिंदे यांनी काही केले नाही. धडक देणा-या गाडीचा क्रमांक मी सांगु शकत नाही. तसेच धडक देणा-या गाडी चालकाचे नाव मी सांगु शकत नाही.

**साक्षीदार सरकार पक्षास पुराव्याकामी सहकार्य करीत नसल्यामुळे सरकार पक्ष उलटतपास घेण्याची परवानगी मागतात, परवानगी देण्यात येते.**

हे मला माहिती नाही की, मला धडक देणा-या ट्रकचा क्रमांक एम.एच. १७ बी. डी. ८१८१ असा होता. हे म्हणणे खरे नाही की, धडक देणारा ट्रक संतोष बाबुराव भालेराव हा चालवित होता. हे मला माहिती नाही की, धडक देणारा ट्रक संतोष बाबुराव भालेराव हा चालवित होता व त्यामुळे क्लिनर सोमनाथ गोपीनाथ शिंदे यांनी पोलिस स्टेशनला तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा अपघात हा आरोपीच्या चुकीमुळे झाला. आता मला माझ्या जबाबातील **रेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला. तो भाग बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझ्या

ओळखीचा असल्यामुळे त्याला वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण,**

**उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ अॅड. श्री. ए. टी. आगळे यांचे मार्फत सुरु-**

हे म्हणणे खरे आहे की, ज्या वाहनाने आमच्या गाडीला धडक दिली त्या वाहनाचा चालक कोण होता हे मी सांगु शकत नाही. त्या धडक देणा-या गाडी चालकाचे नाव मी सांगु शकत नाही. मला आरोपीचे नाव माहिती नाही कारण माझ्या डोक्याला मार लागला होता.

**उलटतपास पुर्ण, फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

PRANITA RITESH SUGAONKAR

Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2025.08.25 15:22:22 +0530

दिनांक :- २५/०८/२०२५

(डॉ. पी. आर. सुगांवकर)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, नेवासा.